आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
९ फेब्रुवारी २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- राज्यसभेत अर्थसंकल्पावर चर्चा सुरू, लोकसभेत सभापतींविरोधात अविश्वास प्रस्ताव आणण्याचा विरोधकांचा निर्णय

- व्यावहारिक अनुभव घेण्यावर भर देण्याचं परीक्षा पे चर्चामधून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं विद्यार्थ्यांना आवाहन

- राज्यातल्या जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत महायुतीची सरशी, २ ठिकाणी सत्तेत येण्याची काँग्रेसला आशा

- राज्यात लवकरच ७० हजार पदांसाठी भरती प्रक्रीया सुरू होणार

**आणि**

- भारत आणि सेशल्स यांच्यामध्ये सात सामंजस्य करार, भारत साडे १७ कोटी डॉलर्सचं पॅकेजही देणार

<><><><><>

राज्यसभेत आज केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चेला सुरुवात झाली. काँग्रेसचे पी. चिदंबरम यांनी चर्चेचा प्रारंभ केला. २०२३-२४ मधे आर्थिक वृद्धी दर १२ टक्के होता तो कमी होऊन २०२४-२५ मधे ९ पूर्णांक ८ दशांश टक्के राहिला आणि २५-२६मधे आठ टक्क्यांपर्यंत आला, याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. वित्तीय तूट फारशी कमी झालेली नाही, औद्योगिक उत्पादन १६ टक्केवरच अडकलं आहे, या बाबी त्यांनी नमूद केल्या. अनेक योजना जाहीरझाल्या पण त्यांच्या साठी पुरेसा निधी मिळाला नाही किंवा जाहीर झाला नाही. विज्ञान, समाजकल्याण, आणि नागरी क्षेत्रासाठी या अर्थसंकल्पानं निधी कमी दिल्याचा मुद्दा त्यांनी मांडला.

युपीए सरकारच्या काळातला अर्थसंकल्प १६ लाख कोटी रुपयांचा होता तो आता ५३ लाख कोटींवर गेला आहे, असं भाजपाचे अरुण सिंग यांनी चर्चेत सांगितलं. गरिबांना पक्की घरं, शेतकऱ्यांना मदत निधी, मनरेगाच्या तुलनेत विकसित भारत जी राम जी योजनेसाठी २२ टक्के जास्त तरतूद या बाबींचा उल्लेख त्यांनी केला.

अर्थमंत्र्यांनी सादर केलेल्या आकडेवारीत अनेक त्रुटी असल्याचं तृणमूल काँग्रेसच्या सुष्मिता देव यांनी सांगितलं. परदेशी गुंतवणूकदारांना सांभाळणं, तसंच क्रिप्टो करन्सीचं नियमन करणं आवश्यक असल्याचं मत आम आदमी पार्टीचे राघव चढ्ढा यांनी मांडलं. आरोग्य आणि वैद्यकीय शिक्षण,यावर अर्थसंकल्पात भर दिला असल्याचं एआयएडीएमकेचे एम थंबीदुराई म्हणाले.

<><><><><>

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांच्या विरोधात हक्कभंगाची नोटीस द्रमुक चे तिरुचि शिवा यांनी राज्यसभेत दिली आहे. संसदेचं अधिवेशन सुरु असताना अमेरिकेबरोबरच्या व्यापार कराराविषयीचा तपशील प्रसारमाध्यमांबरोबरच्या मुलाखतीत उघड केल्याबद्दल आपण हा प्रस्ताव दिला असल्याचं त्यांनी राज्यसभेत कामकाजाच्या सुरवातीलाच सांगितलं. त्याला विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खरगे यांनी पाठिंबा दिला.

<><><><><>

लोकसभेत सभापती ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वासाचा ठराव आणण्याचा निर्णय विरोधी पक्षांनी घेतला आहे. सभागृहात आज अर्थसंकल्पावरची चर्चा सुरु होणार होती. बेशिस्त वर्तनाबद्दल अधिवेशनातून निलंबित झालेल्या सदस्यांचा मुद्दा उपस्थित करु पाहणाऱ्या विरोधकांनी जोरजोरात घोषणा दिल्या. गदारोळ न थांबल्यामुळे सभापतींनी आधी १२ वाजेपर्यंत, नंतर २ वाजेपर्यंत,आणि नंतर दिवसभरासाठी कामकाज तहकूब केलं.

विरोधी पक्षांना बोलू दिलं जात नाही, दिवंगत नेत्यांबद्दल अनुचित टिप्पणी करणारे निशिकांत दुबे यांच्यावर कारवाई होत नाही आणि काँग्रेसच्या महिला खासदारांवर निराधार आरोप केले जातात या कारणास्तव सभापतींविरोधात अविश्वास प्रस्ताव आणायचा निर्णय काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्य दालनात झालेल्या बैठकीत विरोधकांनी घेतला. पदावरून हटवण्यासाठी विरोधकांनी ठराव मांडण्याचा निर्णय घेतला असून कलम ९४ क अन्वये त्याची नोटीस दिली आहे, असं सूत्रांनी सांगितलं. या बैठकीला द्रमुक, सपा, राजद, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, तृणमूल काँग्रेस या पक्षांसह इतर विरोधी पक्षांचे नेते उपस्थित होते.

विरोधी पक्षाचे खासदार सभापतींच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव आणू शकतात. पण तो मंजूर करण्यासाठी त्यांच्याकडे पुरेशा सदस्यांचं पाठबळ नसल्याचं संसदीय कार्यमंत्री किरेन रीजिजू म्हणाले.

<><><><><>

वास्तविक जगातल्या प्रणाली कशा कार्य करतात हे समजून घेण्यासाठी आणि पाठ्यपुस्तकांच्या पलीकडे व्यावहारिक अनुभव मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी उद्योग क्षेत्रातल्या व्यावसायिकांशी संपर्क साधण्याचा सल्ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिला. परीक्षा पे चर्चा २०२६च्या नवव्या आवृत्तीच्या दुसऱ्या भागात आज त्यांनी देशभरातल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना लहान स्टार्टअप्सद्वारे आपला उद्योजकतेचा प्रवास सुरू करण्यास प्रोत्साहित केलं.

विद्यार्थ्यांनी शिक्षण आणि सर्जनशील आवडीनिवडींना वेगळे किंवा परस्परविरोधी मार्ग मानू नये. कला आणि सर्जनशील छंद विद्यार्थ्यांना शैक्षणिक दबावामुळे निर्माण होणारा ताण आणि थकवा कमी करण्यास मदत करू शकतात, असं ते म्हणाले. त्याचवेळी शिस्त आणि प्रेरणा आवश्यक असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**- - होल्ड प्रधानमंत्री बाइट - - -**

<><><><><>

राज्यातल्या बारा जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीत महायुती आघाडीवर आहे. याद्वारे सरकारनं के‍ेलेल्या कामावर जनतेनं शिक्कामोर्तब केल्याचं स्पष्ट होत असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली आहे. राज्यभरात जिल्हा परिषद गटातल्या २३६ जागा भाजपाने जिंकल्या आहेत तसंच ४१० पंचायत समितीच्या जागा जिंकल्या आहेत, असं ते म्हणाले.

**- - - होल्ड बाईट मुख्यमंत्री - - -**

सर्व बारा जिल्हा परिषदांमधे महायुतीचीच, तसंच १२५ पैकी ५० पेक्षा जास्त पंचायत समित्यांमधे भाजपाची सत्ता येईल, असा दावा भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केला.

काँग्रेस दोन जिल्हा परिषदांमध्ये सत्तेवर येईल आणि दोन ठिकाणी सत्तेत भागीदार असेल, असा विश्वास काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला आहे.

<><><><><>

राज्यात लवकरच नोकर भरती प्रक्रिया नव्या पद्धतीने राबवली जाईल. जवळपास ७० हजारांहून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाणार असून यातली सुमारे २० हजार पदे महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडून भरली जातील अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मुंबईत आयोजित बैठकीत ते बोलत होते. भरती प्रक्रियेत कोणताही संशय, पक्षपात किंवा अन्याय होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी. त्याचबरोबर युवकांच्या मनात शंका राहू नयेत, यासाठी प्रणाली स्वच्छ आणि वेगवान असणं गरजेचं आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारत आणि सेशल्स यांच्यामध्ये सात सामंजस्य करार झाले अशी माहिती परराष्ट्र व्यवहार सचिव विक्रम मिस्त्री यांनी नवी दिल्ली इथं घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. हे करार आरोग्य, खनिजक्षेत्र, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान आणि सुशासन या क्षेत्रांशी संबधित आहेत. सेशल्ससाठी १७ कोटी ५०लाख डॉलरच्या मदतीचा समावेशही यामध्ये असल्याचं मिस्त्री यांनी नमूद केलं.

**- - होल्ड - मिस्त्री बाइट - - -**

सेशल्सचे राष्ट्राध्यक्ष पॅट्रीक हर्मिनी पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. सकाळी त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. परस्पर विश्वास आणि भवितव्याची सामायिक दूरदृष्टी यांनी हे दोन देश जोडले गेले आहेत, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले.

**- - - होल्ड प्रधानमंत्री - - -**

दोन्ही देश पुढील पाच वर्षे सहकार्याचं ़ सामायिक धोरण अमलात आणतील. सागरी सुरक्षा आणि स्थानिक स्थैर्य या गोष्टी दोन्ही देशांच्या संबधांच्या केंद्रस्थानी असतील असं हर्मिनी यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

सायबर फसवणुकीचे प्रकार रोखण्यासाठी प्रमाण कार्यपद्धती विकसित करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने केंद्रसरकारला दिले आहेत. येत्या ४ आठवड्यात त्याचा मसुदा न्यायालयात सादर करावा असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं केंद्रीय गृह मंत्रालयाला दिले आहेत.

**//<><><><><>//**